# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

**दिनांक १७/०५/२०२२ (मंगळवार)**

**(दुपार)**

---

### जबर दुखापत

**पो.स्टे. कन्हान** :– अंतर्गत ०३ कि. मी. अंतरावरील बोर्डा गणेशी येथे दिनांक ०८.०५.२२ चे ०८.०० वा. ते ०८.३० वा. सुमारास फिर्यादी नामे– कृष्णा सोनबाजी कुहिटे, वय ५२ वर्ष, रा. बोर्डा गणेशी कन्हान हे आपल्या शेताची मोजणी करून शेत मारकिंग करून खुटया गाडण्या करिता मुला सोबत गेला असता आरोपी क्र. १. पाढुरंग सोनबाजी कुहिटे व २. पवन पाढुरंग कुहिटे दोन्ही रा. बोर्डा गणेशी कन्हान हे तिथे आले व खूटी गाडण्यास मनाई केली. तेव्हा फिर्यादी व आरोपी यांचा वाद झाला. तेव्हा आरोपी क्र. १ हा फिर्यादीच्या अंगावर धावुन आला व त्याने लात मारली लात पकडली असता तो खाली पडला हे पाहुन आरोपी क्र. २ याने फिर्यादीस मागुण पकडून उचलून खाली आढळले त्यामुळे फिर्यादीच्या डाव्या मोंढयाला, पासळीला जबर मुकामार लागुन जखमी झाले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम ३२३, ३२५, ३४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार खुशाल रामटेके मो. नं. ९२८४२६२५९५६ हे करीत आहे.

### अपघातात मृत्यु

**पो.स्टे. देवलापार** :– अंतर्गत १२ कि.मी. अंतरावरील मौजा मानेगाव कला येथे दिनांक १५/०५/२०२२ चे १९.३० वा. ते २०.०० वा. सुमारास एमएच– ४०/एल– ५२७३ क्रमांकाचा ट्रैक्टर व विना क्रमांकाची टाली चा चालक आरोपी क्र. १. राजेराम महागु टेकाम, वय ३५ वर्ष, रा. पथराई त. रामटेक याने आपला ट्रैक्टर रस्त्यावर धोकादायक स्थितीत येण्या–जाण्यास अळथळा होईल तसेच वाहनाला मागचा बाजुला रिफलेक्टर न लावल्याचे अशा हयगयचा स्थीतीत वाहन उभे केले असता एमएच– ३१/बीडी– ८२२६ क्रमांकाचा मोटरसायकलचा चालक आरोपी क्र. २. हर्शल सुदाम वाधाडे(मृतक), वय २५ वर्ष, रा. देवलापार याने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने निष्काळजीपणे चालवुन समोर उभा असलेला ट्रैक्टर ला मागेहुन धडक दिली. या अपघातात मोटरसायकल चा चालक हर्शल वाधाडे हा गंभीर जखमी होवुन तो उपचारा दरम्यान मरण पावला. तर मोटरसायकल मागे बसलेल्या योगेश दभारथ वरठी हा जखमी झाला.

सदर प्रकरणी सरतर्फ पोलिस नाईक मोरेश्वर नागोसे यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. देवलापार येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, २८३, ३३७, ३०४ (अ) भादवी सहकलम १८४, १०४/१७७, ५०/१७७ मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री पुजंरवाड मो.क्र. ८६६८८६५२०३ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर